''रंगभूमीवरील नाट्यदर्शन ही एक संकरित किंवा चौपदरी कला आहे. शब्द हा रंगभूमीवरचा सम्राट असतो हे खरे, पण चित्र, संगीत आणि अभिनय या सामंत कलांचा लवाजमा प्रथमपासून ह्यांच्या तैनातीला आहे. या सर्वांच्या आवश्यक आणि श्रेयस्कर मिलाफातून रंगमंचावरचे नाट्य साकार आणि सुखरूप होते.''

**(वि. वा. शिरवाडकर, ५१ वे संमेलन, कोल्हापूर)**

भूमिका परशराम सामंत यांनी वठवली होती. लक्ष्मण दिनकर ढेरे होते. कृष्णराव कोल्हापुरे यांनी मंथरेची भूमिका केली होती तर शंकरराव मोहिते कैकयी झाले होते.

नोव्हेंबर १९२३ रोजी पूर्ण केलेले 'रामराज्य वियोग' पुस्तक रूपाने सरस्वती मंडळ, पुणे यांनी प्रसिद्ध केले. पुस्तकाची किंमत एक रुपया होती. बलवंत संगीत मंडळीच्या प्रयोगाची छायाचित्रेही पुस्तकात समाविष्ट केलेली आहेत. या पुस्तकाच्या प्रस्तावनेत चिंतामणराव कोल्हटकर लिहितात - त्यांच्या (अण्णासाहेब किर्लोस्कर) मरणानंतर आणखी दोन कवींनी हे नाटक पूर्ण करण्याचा प्रयत्न केला. पैकी रा. खरे यांची 'भरतभेट' पुढील दोन अंक म्हणून रंगभूमीवर आलेले आहेत. त्यात राज्यवियोगानंतरची हकिकत कवींनी घेतलेली आहे. प्रत्यक्ष राज्यवियोगाचा प्रसंग त्यात नाही. तेव्हा त्या दृष्टीने या कथानकाच्या पुढील दोन अंकांची उभारणी केली तर कसे होईल? असा प्रश्न साहजिकच डोळ्यासमोर उभा राहिला. कारण एवढ्या लोकप्रिय व लोकोत्तर व्यक्तीच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा प्रसंग टाकून एकदम भरतभेटीवर जाणे मला तरी निदान अप्रस्तुत वाटू लागले. ज्या एकाच प्रसंगामुळे त्या महापुरूषाच्या पुढील आयुष्याला निराळे वळण लागून ते आर्यावर्ताला आदर्शभूत होऊन बसले व ज्याची देवकोटीत गणना झाली त्याच्या आयुष्यातील संक्रमणावस्थेचा प्रसंग टाकून देऊन एकदम पुढील प्रसंगावर धाव घेणे मनाला बरे वाटेना! जुन्या सर्व नाटकांचा कालगणनेच्या दृष्टीने विचार करता हे जवळजवळ एकच नाटक असे दाखविता येईल की ज्याचा काल तीन अंकापर्यंत जास्तीत जास्त १६ तासांपेक्षा अधिक नाही. तसेच स्थलैक्याच्या दृष्टीने विचार करिता ही घडलेली तीन अंकातील हकिगत एकाच नगरातील आहे! या आधुनिक नाट्यलेखनातील बारकावे समजून उमजून म्हणा, कै. गुरुवर्य अण्णासाहेब यांच्या रामराज्यवियोगात ४२ वर्षापूर्वी साधल्या आहेत ज्या दोन्ही गोष्टी मराठीतील सर्व नाट्यवाङ्मयात ज्या चार दोन नाटकात साधल्या असतील त्यात हे नाटक पहिले आहे असे म्हणणे धाडसाचे होणार नाही! तेव्हा अशा महत्त्वाच्या नाटकाचे पुढील दोन अंक जर तशाच प्रकाराने म्हणजे स्थलांतर होऊ न देता पुढील चार तासातील कथानक घेऊन रंगविता आले तर बरे होईल असे वाटून तशाच रितीने पुढील दोन अंकांची मांडणी केली आहे. मूळ नाटकात कोठेही बदल केलेला नाही. फक्त तिसऱ्या अंकातल्या शेवटच्या प्रवेशात कैकयीने दशरथाच्या मस्तकावर लत्ताप्रहार केला आहे. तेथेच वसिष्ठ व सुमंत मूळ नाटकात आणले आहेत. पण पुढील दोन अंकांच्या रचनेसाठी ही गोष्ट या दोघांना तिथे कळणे मला इष्ट वाटले नाही, म्हणून प्रयोगात लत्ताप्रहार झाल्याबरोबर तेथेच तिसरा अंक पाडला आहे व वसिष्ठ-सुमंताची वाक्ये व पदे पुढे पाचव्या अंकात घेतली आहेत.



चौथा व पाचवा अंक लिहिणाऱ्या चिंतामणरावांची